## राहुल अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी

# ''जिव्हाळ्याचे नाते''



**श्री. सहादू भिकाजी शेरकर**

(अध्यक्ष)

साधारण तेरा-चौदा वर्षाचा असताना मी मुंबईत आलो. जिवाची मुंबई करायला नाही तर नोकरीच्या शोधात. शिरोली बु.।। (ता.जुन्नर), या खेडेगावातला माझा जन्म. आठ भावंडे, आई-वडिल आणि एक चुलती असे आमचे कुटूंब पोट भरण्याचे साधन एकच शेती ती ही तुटपुंजी दिड-दोन एकराचा शेत जमिनीचा तुकडा तोही जिरायती पाण्याचाही तुटवडा आसायचा. त्यामुळे बारामाही पिक घेण अशक्य. वर्षातले आठ-नऊ महीने जेमतेम धान्याची बेगमी होईल इतकेच उत्पन्न, तेही धान्याच्या रुपात. पैसा असलाच कधी तर कनवटीला लावण्यापुरता. मग मजुरी किंवा काही किरकोळ जोडधंदा करुन दिवस रेटायचे. असं खडतर आयुष्य माझ्या कुटुंबांच्याच नव्हे तर गावातल्या अनेक शेतकरी कुटुंबांच्या पाचविला पुजलेल. कधी कुणाकडे उसनं पासनं मागाव तर एकादशीच्या घरी शिवरात्र असा प्रकार. निर्जळी उपावसाचं पुण्य नाईलाजान पदरी पडायचं. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे सातवी पर्यंत शिक्षण घेतलं. पण सातवी नंतरच शिक्षण घेणं म्हणजे माझ्यासाठी उंबराच फुल हाती लागण्याइतकच अशक्य होतं. गावात हायस्कूल नव्हत आणि तालुक्याला पाठविण्या इतपत घरची ऐपत नव्हती, तेव्हा गावी बेकार बसुन खायला काळ आणि भूईला भार होण्याऐवजी मुंबईची वाट धरली.

मुंबईत आल्यावर नोकरी मिळाली भुलेश्वरच्या फुलबाजारात. श्री. चंद्रकांत गणपत कोरपेशेठ यांनी मला नोकरीवर ठेवलं. दोन रुपये रोज. म्हणजे महिन्याकाठी साठ रुपये. १९६० साली पगार ६० रुपये. काम अंग मेहणतीचे आणि कष्टाचे. फुलांचा सहवास मिळाला पण आयुष्य कष्टांच्या काटया कुटयांनी भरलेल. तेही तब्बल १२ वर्ष, एक तप ! संचिताचा भोग प्रत्यक्ष प्रभु रामचंद्राच्या वाटयालाही आला बारा वर्ष वनवासाचा. तर मग माझ्यासारख्या सामान्य माणसाचे देवासमोर काय चालणार? पण माझ्या आयुष्यात एक प्रसंग असा घडला की ज्यामुळे “देव देत कर्म नेतं” ही म्हण खोटी ठरली. त्या प्रसंगानंतर दैवही देत आणि कर्मही देतं असा मला अनुभव आला.

त्या दिवशी मी नेहमीप्रमाणे पहाटे पहाटे दुकान लावत असताना एका गिऱ्हाईकला शेकडा ८/- रु. दराने दोनशे गजरा (फुले) दिला. गिऱ्हाईकाने सौदा केला आणि माल बांधायला सांगुन दुसऱ्या मालासाठी बाजारात फिरत होता. तोवर आमचे दिवाणजी आले व त्यांना मी झालेल्या सौद्याची कल्पना देऊन गिऱ्हाईकाकडून दोनशे गजऱ्याचे शेकडा ८/- रु दराने १६/-रु घेण्यास सांगून आंघोळीला निघून गेलो, परंतू ते गिऱ्हाईक आल्यानंतर आमच्या दिवाणजीने त्याला शेकडा १०/- रु. दराने २०/- रु ची मागणी केली परंतु हे अव्यहार्य असल्यामुळे सदर गिऱ्हाईक माल ठेऊन निघून गेले. आंघोळ करुन आल्यानंतर झाला प्रकार मला समजला. मी काही न बोलता काम करत राहिलो. पण नंतर तोच गाजरा आमच्या कोरपेशेठ यांनी ६/- रु दराने दुसऱ्या गिऱ्हाईकाला विकला व मला त्या जुडया मोजुन देण्यास सांगितल्या. त्या गोष्टीला मी ताबडतोब नकार दिला व पहाटे झालेला प्रकार त्यांना सांगितला. पण शेठजींनी झाल्या प्रकाराकडे दुर्लक्ष केलं. ह्या घटनेचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला. असा लबाडीचा व्यवहार माझ्या तत्वात बसत नव्हता आणि त्यात गिऱ्हाईकां बरोबर केलेली अप्रामाणिकताही समोर येत होती. त्यामुळे सर्वांकश विचार करुन मी त्या दिवसापासून त्या नोकरीचा राजीनामा दिला आणि खऱ्या अर्थाने तोच निर्णय माझ्या आयुष्यातला टर्निंग पॉईंट ठरला.

ही गोष्ट बाजारात सर्वांपर्यंत पोहचली व त्यामुळे माझे कौतुकही झाले.नोकरी सोडली पण पुढे काय? माझ्या बाणेदारपणाचे लोकांनी कौतुक केले पण पोट भरण्यासाठी कौतुकाचा उपयोग काय? शुन्य मग निश्चय केला स्वत:चा धंदा सुरु करायचा धंदयासाठी भांडवलाची तरतूद करणे आवश्यक होते. सुदैवाने काही मित्रांकडून भांडवलाची रक्कम उचलली. आता गरज होती ती धंदयासाठी लागणाऱ्या जागेची दैवाची साथ लाभल्यामुळे त्याचीही व्यवस्था निर्वीघ्न पार पडली भुलेश्वर मार्केटमधील एक मोठे प्रस्थ श्री मल्लीकार्जुन साखरेशेठ यांनी त्यांचीच जागा मला व माझे सहकारी श्री. सुरेशशेठ धनानी यांना भाडे करारावर देऊ केली. मी त्यांच्याच नावाने लेबल वापरुन धंद्यास सुरुवात केली. त्यावेळी मनुष्यबळ ही गरजेचे होते. तेव्हा माझ्या जिवा भावाचे जिवलग मित्र **श्री. बन्सी नामदेव राऊत, श्री. कोंडाजी बन्सी थोरवे व श्री. बबन बोचरे** हे माझ्या खांदयाला खांदा लावून अगदी भावासारखे उभे राहीले.

काही वर्षांनंतर श्री. मल्लीकार्जुनशेठ साखरे यांच्या नंतर त्यांची पत्नी श्रीमती शांताबाई मल्लीकार्जुन साखरे यांच्या नावाने धंदा सुरु ठेवला. साधारणपणे १९९१ साली श्रीमती शांताबाई यांची वृध्दापकालाने तब्बेत खालावली व त्यांनाही मुलबाळं नसल्यामुळे त्यांनी त्यांची जागा मला विकत घेण्या संदर्भात प्रस्ताव मांडला. तेव्हा मी व माझे सहकारी श्री. सुरेशशेठ धनानी यांनी विचार विनीमय करुन तो व्यवहार पुर्ण करण्याचे मान्य केले. रितसर सर्व कायदेशिर सोपस्कार करुन मी तो गाळा विकत घेतला तेव्हा वाटले आजवर केलेल्या माझ्या प्रामाणिकपणाची आणि विस्वासर्हतेची पोच पावतीच मला मिळाली. त्या सर्व व्यवहारामध्ये **१. श्री नानाशेठ गावंड, २. श्री धोंडीभाऊ औटी, ३. कै. श्री पांडुरंगशेठ शिवकर, ४. कै. श्री दत्तात्रयशेठ दुराफे** या संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळेच भुलेश्वर फुलबाजारात मी आता अधिकृत व्यापारी झालो रोजंदारीवर काम करणारा नोकर ते अधिकृत व्यापारी अशा माझ्या प्रवासात तीस वर्षे उलटून गेली. या सर्व घटना क्रमात माझा संसारही उत्तमपणे मार्गी लागला. धंदयामधे मी प्रामाणिक पणा आणि स्पष्टवक्ते पणा कधीही सोडला नाही. त्यामुळे बाजारात माझ्याकडे सर्वजन खूप विश्वासू नजरेने पाहतात. कारण माझे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे नाहीत. तगरीची सफेद फुलं मोगऱ्यासारखी दिसतात म्हणून हा मोगराच आहे. असे सांगुन कोणत्याही अनभिज्ञ ग्राहकाची फसवणुक केली नाही.

बघता बघता मुंबईत येऊन मला ३० वर्ष उलटली होती.दरम्यान च्या काळामध्ये माझे एक नातेवाईक श्री गणेश जाधव यांनी शिवशक्ती को-ऑ. क्रे. सोसायटीची स्थापना केली होती आणि त्या संस्थेच्या संचालक पदी माझी व माझे मित्र श्री. शंकरराव भुजबळ यांची निवड केली होती आणि तिथ पासुन आम्हा दोघांचा सहकार क्षेत्राशी संबंध आला. काही वर्षे आम्ही दोघांनीही तेथे संचालक म्हणून काम पाहिले. परंतु त्या पतपेढीत आम्ही काही फार काळ रमलो नाही आणि अखेरीस मी व शंकररावांनी पदाचे राजीनामे दिले.

परंतु शिवशक्ती पतसंस्थे सारखी आपल्याही गावकऱ्यांची मुंबई मध्ये एखादी पतसंस्था असावी जेणे करुन आपल्या गरीब गावकऱ्यांची सावकारी व्याजातुन मुक्तता व्हावी व आपल्या वाट्याला आलेले कडू अनुभव त्यांच्या वाट्याला येऊ नयेत, त्यांच्या धंद्यासाठी, लग्नकार्यासाठी व स्थावर मालमत्ता खरेदीसाठी कमी व्याजदराने भांडवल उपलब्ध व्हावे, ही इच्छा मनामध्ये बळावली. आमचा हा मनसुबा आमचे नवजवान संघाचे सर्व सहकाऱ्यांना बोलन दाखविला. ते ऐकून सर्व सहकाऱ्यांनी एकमुखी पठिंबा दिला परंतु हे पाहून सहकार क्षेत्रातले हे काम तुम्हाला जमेल की नाही अशी शंका देखील बोलन दखविली. आणि ते खरं देखील होते. कारण सहकार क्षेत्रातला अनुभव तुटपुंजा होता. पण धंद्याचा, व्यापाराचा तरी आम्हाला कुठे अनुभव होता? तरीही नोकर ते व्यापारी अशी मी प्रगती केलीच की. पाण्यात पडलो की हातपाय हलवावेच लागतात. म्हणजे पाहता येते. काठावर बसून पाण्याकडे पाहात बसणे माझ्या स्वभावात नव्हते.

पतसंस्था काढायची असा निर्णय घेतल्यावर मी व माझे सहकारी जोमाने कामाला लागलो. पहिली मोहीम हाती घेतली सभासद नोंदणीची आप्तस्वकीय, नातेवाईक, खेड्यातल्या शब्दांत सांगायचे तर भावकी आणि गावकीतल्या अनेकांची मने वळवून पहिल्याच धडाक्यात ५२५ सभासदांची नोंदणी करुन ती मोहीम फत्ते केली.

त्यानंतरचे पुढचे पाऊल म्हणजे कायदेशिर बाबी पुर्ण करणे सगळ्यात आधी आवश्यक म्हणजे सोसायटीचे रजिस्ट्रेशन त्यासाठी आम्ही मंत्रालयात खेटा घातल्या, ओळखी काढल्या. त्या वेळचे सहकारमंत्री श्री. प्रकाश कल्लाप्पा आवाडे ह्यांची भेट घेतली. आमच्या भागातले तेव्हाचे खासदार माननीय श्री निवृत्तीशेठ शेरकर यांनी आमच्या कामाला पाठींबा देऊन आशिर्वादही दीला, वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शनही केले. ते आमचे प्रेरणास्थान होते. आमच्या कामाची तळमळ, प्रयत्न आणि **प्रामाणिक पनाची** दाखल घेऊन सहकार मंत्र्यांनी स्वत:च्या आधिकारात संस्थेचे रजिस्ट्रेशन केले. तो संस्मरणीय दिवस होता २९ जानेवारी १९९० सर्वानुमते संस्थेचे नामकरण केले **''राहुल अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई''** (नोंदणी क्रमांक बी. ओ. एम. / डब्लू. ई. / आर. एस. आर. (सी.आर) /४३९ /१९८९-९०)

रजिस्ट्रेशन करुन संस्थेची स्थापना झाली आता कामकाजासाठी जागा मिळविणे हे मुख्य उद्दिष्ट होते. श्री दिनेश भाई नाईक यांनी तो प्रश्न सोडविला त्यांनी भायखळ्यातील त्यांचीच एक जागा संस्थेला उपलब्ध करुन दिली. त्या जागेवर ३१/३/१९९० रोजी **राहुल अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे** उद्घाटन मोठया थाटात श्री. **विलासरावजी देशमुख** यांच्या शुभहस्ते पार पडेल. त्या उद्घाटन प्रसंगी तत्कालीन आमदार बी. टी. झुटे, मा.श्री दिलीप वळसे पाटील, खासदार आणि विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन श्री निवृत्तीशेठ शेरकर या मान्यवरांनी प्रमुख आतीथी म्हणून उपस्थिती लावली.

१ एप्रिल १९९० मध्ये सोसायटीच्या प्रत्यक्ष व्यवहारीक कामकाजास सुरुवात झाली. मुदत ठेवी गोळा करणे, कर्ज वाटप करणे, दैनंदीन वसुली चालु करणे असा व्यवहार चालू झाला. श्री भवानीशंकर शेट्टी साहेबांनी ठेवीदारांना आकर्षित करण्याचा धडाकाच हाती घेतला. थोडक्याच अवधित दिनेश भाईंची जागा अपूरी पडू लागली, नवीन जागेत कार्यालय हलविणे आवश्यक होते. श्री नितीन बनकर यांनी लक्ष्मी बिंल्डीग मध्ये सोसायटीला सोईस्कर अशी जागा पाहिली व त्या जागेचा व्यवहार पुर्ण करुन स्वमालकीच्या प्रशस्त जागेत कामकाज सुरु केले संस्थेची स्वमालकीची जागा होणे ही खूप अभिमानाची आणि संस्थेच्या प्रतिष्ठेची गोष्ट होती त्यामुळे संस्थेची विश्वासर्हाता देखील वाढली.

सोसायटीचे सर्वच पदाधिकरी तळमळीने, प्रामाणिकपणे काम करत होते. वादविवाद, चर्चा होत. परंतु सर्व निर्णय एकमुखाने घेतले जात. आमच्या समोर खासदार व विघ्नहर सहकारी साखर कारखान्यांचे संस्थापक अध्यक्ष शिरोली कृषक सहकारी विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री. निवृत्तीशेठ शेरकरांचा आदर्श होता. त्यांचे निष्कलंक चारीत्र्य, प्रामाणिकपणा आणि सामाजिक कार्याची तळमळ हे ध्येय आम्ही डोळ्यासमोर ठेवले. निवृत्तीशेठ हे आमचे प्रेरणास्थान होते ते आमच्यासाठी सांगेन गोष्टी युक्तीच्या चार असे आमच्यासाठी भगवान श्रीकृष्ण होते.

थोडयाच अवधित संस्थेच्या प्रगतीचा आलेख उंचावला. शाखा विस्तार केले गेले. मुदतठेवी आणणे आणि गरजुनां कर्ज वाटप करण्याबरोबरच कर्जाची वसुली करणे ही कामे नित्याचीच झाली. कर्ज वसुली हा मात्र थोडा नाजुक विषय होता तोही आम्ही प्रेरणेत आणि सक्षमतेने हाताळला परंतु काही वेळा कटूता पत्करावी लागली त्याला नाईलाज होता. पतसंस्था ही काही आमची खाजगी मालमत्ता नाही संचालक मंडळाने हे भान कायम ठेवले आमची ***विश्वासर्हता*** हाच राहुलचा भक्कम पाया आहे.

काही वर्षांनी सहकार क्षेत्रातील नियमांमध्ये सरकारने अमुलाग्र बदल केले प्रत्येक विभागात उदा. कर्ज वितरण, ठेवी, नफा, गंगाजळी आणि

पहिला प्रसंग अगदी सुरुवातीला जेव्हा मी मार्केटमध्ये रोजंदारी करत होतो. तेव्हा डोक्यावर ओझे घेऊन येणाऱ्या इसमास माझा चुकून धक्का लागला. खरतर मार्केटमधल्या अपुऱ्या जागेत जी लगबग चालते त्या लगबगीत,गर्दीत धक्का लागणे ही काही गंभीर बाब नव्हती,पण त्या ओझेवाल्याला राग येणं सहाजिक होत. तो संतापून मला काही बोलला, मी शांत राहिलो, त्याची माफी मागितली. तर तो शांत होऊन माझ्याशी प्रेमाने बोलला म्हणाला,"भाऊ, ओझेवाल्याला त्रास होणार नाही एवढच बघ''. दुसरा प्रसंग-मी माझ्या एका खरेदीदाराकडे वसूलीसाठी गेले होतो. त्याची ऊधारी थकली होती. मी त्याच्यासमोर जाऊन बसलो. तो ही काहीबाही कारणे सांगू लागला. तेव्हा मी त्याला सांगितले, "मला लाफा मार". तो गांगरला, म्हणाला शेठ कशासाठी ? मी त्याला बोललो, "अरे बाबा, तुला उधारीत" माल देऊन. मी चूक केली. त्या चूकीची शिक्षा मला व्हायला हवी, तेव्हा मला लाफा मार म्हणजे यापुढे मी कुणाला माल द्यायचा ह्याची काळजी घेईन. तर ह्या प्रसंगांमुळे मी शिकलो की वसूलीसुध्दा प्रेमाने करायला हवी.

सोसायटीचे ऑडीट, कायदेशीर वसूली वगैरे कायदेशीरबाबतीत आम्ही थोडे अनभिज्ञच होतो. त्यासाठी आम्ही बँकींग क्षेत्रातले आमचे गांवकरी श्री. बाजीराव थोरवे ह्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आमच्या सोसायटीला ऑडीटर्सनी नेहमीच उत्तम शेरा दिला. तसेच त्यांच्या मार्गदर्शनामुळे आमची कर्जवसूली जवळजवळ शंभर टक्के तसेच पुर्ण होत आहे.

या पंचवीस वर्षात माझी वैयक्तीक भरभराट झालीच, माझे संपूर्ण कुटुंब आर्थिक दृष्टया सदृढ होईल यांची काळजी मी घेतली. राहूल सोसायटी सुध्दा माझ्या कुटूंबाचा अविभाज्य भाग आहे. हे कुटूंबसुध्दा भक्कम आर्थिक पायावर उभे राहील यांची काळजी मी आणि सोसायटीच्या समस्त संचालक मंडळाने घेतली. आम्ही एक दिलाने, एक मताने गेली पंचवीस वर्षे या कुटुंबाचा सांभाळ अतिशय निःस्वार्थपणे करत आलो वसूलीच्या प्रसंगी नाईलाजास्तव आम्हांला कटुता पत्करावी लागली. अन्यथा आमचे सगळे व्यवहार अत्यंत पारदर्शक आणि गोडीगुलाबीत सुरु आहेत. ह्या पुढे त्यांत खंड पडणार नाही. मार्च २०१४ अखेर आमचा **नफा रु. २५,०५,८३१.१२** आहे. २५ वर्षांपूर्वी आम्ही सहकार क्षेत्रात काम करु शकणार नाही- अशा शंकासुरांना आमचा सचोटीचा कारभार,चोख व प्रामाणिक व्यवहार हेच उत्तर आहे.

माझ्या कौटुंबिक आणि सोसायटीच्या जबाबदऱ्या मी माझ्या आईच्या आशीर्वादाने, तसेच माझी पत्नी सौ. भागूबाई (नानी) चार मुले ह्यांच्या पाठबळावर यशस्वीपणे पेलल्या.

माझी चार मुले आता प्रौढ झाली आणि ती स्वतःच्या जबाबदाऱ्या पेलण्यास समर्थ आहेत. राहुल हे माझे पाचवे अपत्य आहे - त्यानेही वयाच्या पंचविशीत मोठ्या दिमाखाने पाऊल टाकले आहे. ह्या अपत्याची उत्तरोत्तर प्रगती होईल असा मला विश्वास आहे. त्याच्या प्रगतीत, भरभराटीतच माझे समाधान आणि निखळ आनंद आहे.

आपणा सर्वांना नववर्षाच्या **हार्दिक शुभेच्छा !**

शब्दांकन

**शशांक वेचलेकर**

डोंबिंवली